http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part—III) Examination

## (Compulsory Languages)

## MARATHI

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

**सूचना :— सर्व** प्रश्ना सोडविणे आवश्यक.

1. महात्मा गांधी यांनी विद्यापीठ निर्मितीमागील कोणती भूमिका विशद केली आहे ?

**किंवा**

अंधश्रद्धेच्या आहारी जाणाऱ्या उच्चविद्याविभूषीत वर्गावर श्याम मानव यांनी कसे प्रहार केले आहे ? 12

2. वा. ना. देशपांडे यांनी 'वऱ्हाडी' बोलीच्या स्वरूपावर कसा प्रकाश टाकला आहे ?

**किंवा**

राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या कोणत्या विविध उपाययोजना पंढरीनाथ पाटील यांनी सूचविल्या ? **8**

3. आधुनिकीकरणामुळे बदललेल्या कुटुंबव्यवस्थेचे मार्मिक चित्रण 'घर' या लेखात कसे आले आहे ? ते लिहा.

**किंवा**

कुलु खोऱ्यातील बगल्यांचा शिकारीचे हृद्य वर्णन 'प्रेम' या लेखात मारुती चित्तमपल्ली यांनी कसे कथन केले आहे ? 12

4. बन्सीच्या जीवनाची शोकांतिका श्री म. माटे यांनी कशी चित्रित केली आहे ?

**किंवा**

'म्हातारपणाचे फायदे' या कथेचा आशय स्पष्ट करा. 8

5. 'पयसाची लाल आग व्हय !' या कवितेचे रसग्रहण करा.

**किंवा**

'बिकट वाट वहिवाट' या फटक्यातून अनंत फंदींनी लोकांना कोणता उपदेश केला आहे ? 12

6. कान्होपात्रेची विट्ठलभेटीची आर्त भावना 'नको देवराया, अंत आता पाडू' या अभंगातून कशी व्यक्त होते ?

**किंवा**

'नदी किनारी' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 8



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

7. (अ) भारतीय महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर येथे विज्ञान शाखा नव्याने सुरु झाली आहे, प्रवेसासाठी जाहिरातीचा नमुना तयार करा.

**किंवा**

मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात संपन्न झालेल्या वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनाची बातमी वृत्तपत्रासाठी तयार करा. 5

(ब) खालील उताऱ्यावरील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :—

एक माणूस औषध खाऊन खाऊन कंटाळून गेला. कारण जों जों औषध जवळ करावे तों तों आरोग्य दूर पळू लागले. शेवटी कोणाच्या सूचनेवरुन त्याने शेतात काम सुरु केले. शेतातल्या कामाने आरोग्य लाभून थोड्याच दिवसात तो मोठा तगडा झाला. अनुभवाने सिद्ध झालेली ही आरोग्याची साधना तो लोकांना सांगू लागला. एखाद्याच्या हातात बाटली पाहिली की, "बाटलीने काही व्हावयाचे नाही, कुदळ घे म्हणजे आराम मिळेल" असा तो मनोभावाने उपदेश करी, लोक म्हणत — "तुम्ही बाटली खाऊन तृप्त होऊन बसलात आणि आम्हाला तवढी बंदी करता ?" दुनियेचे असेच आहे. दुसऱ्याच्या अनुभवाने शहाणपण शिकण्याची माणसाला इच्छा होत नाही, त्याला स्वतंत्र अनुभव पाहिजे. मी चांगला सांगतो की, "पुस्तकापासून काही फायदा नाही. व्यर्थ पुस्तकांत घोटाळू नको" तर तो म्हणतो, "तुम्ही पुस्तके वाचून चुकला आणि भला असा उपदेश करता ?" "होय, मी पुस्तकें वाचून चुकलो. पण तू चुकू नये म्हणून सांगतो." तो म्हणतो, "मला अनुभव पाहिजे", "ठिक आहे, हो अनुभव. ठेचाळण्याचे स्वातंत्र्य ला तुझा जन्म-सिद्ध हक्क आह" इतिहासाचा अनुभव आम्ही विचारात होत नाही. म्हणून इतिहासाची पुनरावृत्ती होते. आम्ही इतिहासाची किंमत करू तर इतिहासाच्या पूढे जाऊ, इतिहासाची किंमत न केल्याने त्याची किंमत उगीचच वाढून बसली आहे, पण हे लक्षात येईल तेव्हा खडे ! 5

**प्रश्न** :

(1) माणूस औषध खाऊन का कंटाळला होता ?

(2) थोड्याच दिवसात माणूस तगडा कसा झाला ?

(3) इतिहासाची पुनरावृत्ती कशामुळे होते ?

(4) लेखकाच्या मते अम्ही इतिहासाच्या पुढे केव्हा जाऊ ?

(5) वरील उताऱ्याला समर्पक शीर्षक सूचवा.

**किंवा**

वरील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश लिहा.



http://www.sgbauonline.com/